# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर -४१६००४

## ** प्रकटन **

**विषयः-मार्च-२०२० मध्ये माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेसाठी (इ.१० वी) प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना शास्त्रीय कला, चित्रकला व लोककलेचे सवलतीचे वाढीव गुण देणेबाबतचे प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत..**

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या अखत्यारीतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळेचे शाळाप्रमुख, शिक्षक, विद्यार्थी व पालक आदींना सूचित करण्यात येते की, **शासन निर्णय दिनांक २४/११/२०१७ नुसार** शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याचे प्रस्ताव विभागीय मंडळाकडे सादर करण्याची **अंतिम मुदत दि.१५ जानेवारी २०२० पर्यंत** देण्यात आली होती.

शासनाने दिनांक १६/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये शास्त्रीय कला, चित्रकला, व लोककलेचे सवलतीच्या गुणांचे प्रस्ताव **विद्यार्थ्यांनी शाळेकडे सादर करण्यास दि.१५ फेब्रुवारी २०२० पर्यंत** व **शाळांनी विभागीय मंडळाकडे प्रस्ताव सादर करण्यासाठी दि.२५ फेब्रुवारी २०२० पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे.** त्यानुसार शास्त्रीय कला, चित्रकला व लोककलेचे परिपूर्ण प्रस्ताव माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे **दि.२५ फेब्रुवारी २०२० पर्यंत सादर करावयाचे आहेत. त्यानंतर मुदतवाढ देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.**

तरी मार्च-२०२० मधील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेसाठी (इ.१०वी) प्रविष्ठ झालेले सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक व सर्व माध्यमिक शाळा यांनी नोंद घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी. कोणताही पात्र विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची सर्व शाळाप्रमुखांनी दक्षता घ्यावी.

20.01.2020

**विभागीय सचिव**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.**

**दिनांक :- २०/०१/२०२०**